# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७८३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/११/२०१७

**१) बांधकामा वरील स्वयपांकाचे साहीत्य,रेंजर सायकल व बॅटरीची चोरी . :–**

दिनांक २२+२३/१०/२०१७ चे २२.०० ते ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा जेएमफसी कोर्ट तुमसर येथील बांधकामावरील चौकीदार याचे स्वयंपाकाचे साहीत्य व सायकल हरकुलर्स कंपनीची रेंजर सायकल पुरानी, ट्रॅक्टरची बॅटरी असा एकुन ५,०००/रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी देवराम मंगरू पाटील वय ६५ वर्ष रा. देव्हाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २३/१०/२०१७ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी दुर्योधन नत्थु मानकर वय २७ वर्ष रा. किन्ही एकोडी यानी त्याची हिरो कंपनीची स्प्लेंडर प्रो मोटार सायकल क्र. २९ एएफ ७८३३ किमती २५,०००/रु ची हॅन्डल लॉक करून सरकारी दवाखाण्याचे ठेवले असता, कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**३) नाल्याचे पाईपचे लोखंडी प्लेटची चोरी. :–**

दिनांक १८+१९/११/२०१७ चे १९.०० ते ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी धर्मेद्र यशवंत गजापुरे वय ३३ वर्ष रा. विहीरगाव सानगडी याने पाहुणी येथे खात डांबरी रोडाचे नाल्याचे पाईपचे कलवटचे कामाकरीता ठेवलेले १५ लोखंडी प्लेट किमती २५,०००/रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) एटीम मशिनचे कुलुप तोडुन पैसे चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २२/११/२०१७ चे २२.५० ते दिनांक २३/११/२०१७ चे ००.१७ वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपी हा एटीएम मध्ये प्रवेश करून एटीएम मशिनला लावलेले समोरील कुलुप तोडुन त्यामधील पैसे चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे राजेश कुमार रमाकांत गुप्ता वय ३० वर्ष रा. मिस्कील टॅक भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८०,५११ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राठोड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/११/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही सायकलने आंबाडी ते अतरी मार्गे कोंढा येथे जात असतांनी आंबाडी ते अतरी येथे जाणाऱ्या रोडवर आरोपी हा अचानक फिर्यादीचे समोर येवुन फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६ भा.दं.वी. सहकलम १२ लैगिंक अपराध बालसंरक्षण अधी.२०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**६) भांडण व शिवीगाळ करून कुऱ्हाडीच्या दांडयाने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २२/११/२०१७ चे २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी संजय मोतीराम पंचबुधे वय ३० वर्ष, रा. खैरलांजी हा पत्नी हिचे सह जेवन करीत असता यातील आरोपी हा फिर्यादीचे घरा समोर अंगनात येवुन फिर्यादी व त्याची पत्नीला मामी बाहेर या, असे म्हणुन आवाज दिले असता फिर्यादी व त्याची पत्नी घराबाहेर आले असता मामी तुम्ही लोकांना काय सांगितले ती, मांढळ ची मुलगी घेवुन पळालो असे म्हणुन तुम्ही आमची गावभर बदनामी केली, असे म्हणुन भांडण शिवीगाळ करून आरोपीने फिर्यादीचे अंगणात असलेल्या कुऱ्हाडीच्या दांडयाने फिर्यादीच्या गालावर, कानावर, डोक्यावर मारून जखमी केले तसेच फिर्यादचे पत्नीला कुऱ्हाडीच्या दांडयाने पाठीवर मारून जखमी केल्याने फिर्यादी संजय मोतीराम पंचबुधे वय ३० वर्ष रा. खैरलांजी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४४७,३२४,३२३,५०४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कडबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक २३/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा,जवाहरनगर,मोहाडी,कारधा,करडी, वरठी तुमसर, लाखनी,पालांदुर व लाखांदुर येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण १९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १४४ लिटर हातभट्टी दारू + १८० किलो सडवा मोहा किंमती १८,७९०/—रू. व ६ लिटर ३० मिली लिटर देशी दारु किंमती २,४६०/—रु. तसेच जुगारातुन किंमती १६८९/—रु असा एकुण किंमती २२,९३९/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २३/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०९ तीन सिटर वाहनांवरती १८ केसेस व ईतर वाहनांवरती १०३ केसेस करण्यात आलेले आहे.


**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.